## <u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>

(पारित दिनांक १२/०३/२०२६)

प्रस्तुत अर्ज कलम ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जास कुणाचे आक्षेप आहे किंवा काय हे तपासुन पाहण्याकरीता दिनांक २५/०१/२०२६ रोजी, दैनिक वृत्तपत्र 'नवराष्ट्र' मध्ये जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदर वृत्तपत्र दस्तऐवज यादी **(नि.क्र.९)** सोबत जोडले आहे व नियमानुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेले असून त्यांचे अहवाल **(नि.क्र.७)** प्रमाणे जोडलेले आहेत. जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून विहित मुदतीत अर्जास कोणीही आक्षेप घेतला नाही.

३. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१ सुनिता दिलीप धाकडे यांना **नि.क्र.१०** प्रमाणे तपासले आहे. मयत दिलीप रामचंद्र धाकडे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, मयताची आई रूखमा रामचंद्र धाकडे यांच्या मृत्युप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत व अर्जदारांच्या आधार कार्डांच्या सत्यप्रती दस्तऐवज यादी (**नि.क्र.०४)** सोबत दाखल केलेल्या आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे अपत्य आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत दिलीप रामचंद्र धाकडे यांचे वारस आहेत. मयत दिलीप रामचंद्र धाकडे हे दिनांक १०/१२/२०२५ ला मरण पावले. अर्जात नमूद व्यक्तींच्या व्यतिरिक्त मयत

दिलीप रामचंद्र धाकडे यांना कोणीही वारस नाही. अर्जदारांनी वारस म्हणून, खाजगी व शासकीय योजनेचा लाभ मिळावा म्हणून, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्ज दाखल केला आहे.

४. न्यायालयासमक्ष दाखल केलेल्या तोंडी व लेखी साक्षपुराव्यावरून, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत दिलीप रामचंद्र धाकडे याचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. करीता पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येते.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत दिलीप रामचंद्र धाकडे यांचे वारस असल्याबाबत, अपेडिक्स–बी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये औपचारीक दाखला देण्यात यावा.

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.12 17:16:29 +0530

दिनांकः १२/०३/२०२६.

**(सतिश गोपालराव गोरे )**
**दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), देसाईगंज.**
JO CODE- MH02902